MHST 0500 0225 2014

**विशेष दिवाणी दावा क्र.२६/२०१४**
**मे.रतन मेटल्स तर्फे**
**श्री. विनोद मणिलाल ओसवाल.**
**वि.**
**मे. यश एन्टरप्रायझेस**
**तर्फे सौ. रेखा ह्दयनाथ पार्टे व १.**

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. पी. व्ही. ढापरे.**
**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ – श्री. एन. व्ही. भोसले.**

## निशाणी क्र. ८३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचेतर्फे त्यांचे मुखत्याराने दिलेले निशाणी क्र.८१ वर दाखल असलेले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र/सरतपास रद्द करण्यात येवून प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांचे वैयक्तीक अखत्यारीत सरतपास दाखल करण्याचा आदेश व्हावा याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूच्या विद्वान विधीज्ञांनी निशाणी क्र.९३ व निशाणी क्र.९४ वर दिलेल्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. तसेच वादी यांचे तर्फे उपस्थित असलेले विधीज्ञ श्री. व्ही. एम. मगर व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यातर्फे उपस्थीत असलेले विधीज्ञ श्री. एन. व्ही. भोसले या दोन्ही विद्वान विधीज्ञांचा संक्षिप्त युक्तीवाद देखील ऐकला. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ

i) **Manisha Mahendra Gala & ors. Vs. Shalini Bhagwan Avatramani & ors Civil Appeal No.9642 of 2010 decided on 10th April, 2024**

ii) **Janki Vasudev Bhojwani Vs. Indusind Bank Ltd. (AIR 2005 Supreme Court 439)** या न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे.

याउलट, प्रतिवादी यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ

i) **Humberto Luis Vs. Floriano Armando Luis (2000 AIHC 1572(Bombay)** या न्यायनिवाड्याचा आधार घेतलेला आहे.

०३. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील वाद हा वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे सोबतचा व्यवसायातील येणे रक्कम वसूल करण्याबाबतचा व्यवहार आहे. सदरच्या व्यवहाराबद्दल प्रतिवादी क्र.१ व २ हे योग्य प्रकारे माहिती देवू शकतात. मालकाने केलेल्या व्यवहाराबद्दल मुखत्यार हा साक्ष देवू शकत नाही. त्यामुळे त्याचा सरतपास कायद्याने चालू शकत नाही. मुखत्यार यास वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यामध्ये असलेल्या व्यवहाराबाबत काहीही माहिती नाही. मालकाच्या वैयक्तीक माहितीत असलेल्या घटनांबाबत मुखत्यार हा साक्षही देवू शकत नाही. तसेच उलटतपाससही सामोरे जावू शकत नाही. म्हणून मुखत्यार याचे शपथपत्र रद्द करण्याबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. याउलट, प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.१ ही सतत आजारी असते. प्रतिवादी क्र.२ हे पोटपाण्याच्या उद्योगानिमित्त व्यस्त असतात. म्हणून त्यांनी युवराज शामराव पार्टे यांना मुखत्यार नेमलेले आहे. युवराज हा यश एंटरप्रायझेसमध्ये काम करीत आहे. तो प्रतिवादी यांचे घरातील व्यक्ती आहे. युवराज यास वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमध्ये झालेले सर्व व्यवहाराबाबत व यश एंटरप्रायझेसच्या कारभाराबाबत संपूर्ण ज्ञान आहे व त्याबाबतची माहिती प्रतिवादींनी त्यास दिलेली आहे. याबाबी मुखत्यारपत्रात नमूद आहेत. व्यवहार हा मे.रतन मेटल्स व मे. यश एंटरप्रायझेस या प्रोप्रायटर कंपनीमध्ये झालेला आहे. तो वैयक्तीक नाही. त्यामुळे युवराज यास मुखत्यार करून देण्यास कायद्याने कोणतीही बाधा येत नाही. या बाबींचा विचार करता अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

०५. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरूध्द वसूलीकरीता, भविष्याचे व्याज मिळावे, जंगम व स्थावर मालमत्ता जप्त करून तिची विक्री करून मिळावी व इतर कारणांकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी हे न्यायालयात हजर होवून त्यांनी निशाणी क्र.१४ ला कैफियत दाखल करून दाव्यास हरकत नोंदविलेली आहे. या न्यायालयाचे तत्कालीन पूर्व पिठासिन अधिकारी यांनी दोन्ही बाजूंच्या परस्पर विरोधी कथनांचा सारासार विचार करून निशाणी क्र.२५ वर वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यानंतर वादीतर्फे निशाणी क्र.२६ ला सरतपसाचे प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर उलटतपास पूर्ण झालेला आहे. वादीतर्फे पुरावा बंद

केल्याची पुरसिस निशाणी क्र.३८ वर देण्यात आलेली आहे.  त्यानंतर प्रतिवादीतर्फे निशाणी क्र.८१ वर मुखत्यार यांचा सरतपास दाखल करण्यात आलेला आहे.  तो सरतपास या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी वाचून अभिलेखावर दाखल करून घेतलेला आहे.  प्रतिवादी यांनी उलटतपास घेतला नव्हता त्यामुळे दि.०४/०२/२०२१ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश त्यांच्याविरूध्द पारीत झालेला होता.  तर निशाणी क्र.८२ वर प्रतिवादीतर्फे जादा तोंडी पुरावा देणे नाही अशी पुरसिस देण्यात आली आहे.  प्रतिवादी क्र.१ व २ यांनी युवराज शामराव पार्टे यास करून दिलेले मुखत्यारपत्र  निशाणी क्र.७७ वर केलेले आहे.  प्रतिवादी यांचेविरूध्द उलटतपास नाही हा आदेश दि.०४/०२/२०२१ रोजी झाल्यानंतर अद्यापपावेतो सदरचा आदेश बाजूला सारून मिळावा अशा प्रकारचा अर्ज अभिलेखावर दाखल करण्यात आलेला दिसून येत नाही.  दरम्यान प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला दिसून येतो.

०६.	प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुखत्यार युवराज यास वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे दरम्यान झालेल्या व्यवहाराबाबत व दाव्यातील घटनांबाबत संपूर्ण माहिती असल्याचे नमूद केले आहे.  अभिलेखावर दाखल असलेल्या मुखत्यारपत्रामध्ये व सरतपासात देखील सदरच्या बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत.  प्रस्तुतचा अर्ज हा 'उलटतपास नाही' हा आदेश पारीत झाल्यानंतर विलंबाने दाखल करण्यात आलेला आहे. मुखत्यार हा त्याच्या माहितीत असलेल्या घटनांबाबत साक्ष नोंदवू शकतो अशी कायद्याची स्थापित स्थिती आहे.  सरतपास रद्द करावा याबाबत कोणत्या कायद्यामध्ये कोणत्या कलमातील तरतूदीनुसा प्रस्तुचा अर्ज दाखल केलेला आहे हे वादीने दर्शवून दिलेले नाही. या सर्व घटना व तथ्यांचा, कायदेशीर तरतूदींचा व दाखल करण्यात आलेल्या न्यायनिवाड्याचा विचार करता असे दिसून येते की, वादी यांनी दिलेला प्रस्तुतचा अर्ज हा पुरेशा कारणाशिवाय दिलेला असल्याचे दिसून येत असल्यामुळे तो नामंजूर होण्यास पात्र आहे.  म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१.	अर्ज (निशाणी क्र. ८३) खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. प्रकरणाची कार्यवाही पुढे सुरू राहावी याकरीता वादी यांनी आवश्यक ती पाऊले उचलावीत असा आदेश त्यास देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2024.06.15 16:09:49 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः १५/०६/२०२४ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.